# नियमीत विचारण्यांत येणारे प्रश्न (FAQs)

## ऑनलाईन अर्ज सादर करणेपुर्वी काय करावे ?

- विद्यापीठाचे संकेतस्थळ www.mafsu.in or le.mafsu.in यावर लॉगईन करावे.
- संबंधीत अभ्यासक्रमावर click करावे.
- माहिती पुस्तिकेच्या लिंकवर click करावे. माहिती पुस्तिका काळजीपुर्वक वाचावी आणि अभ्यासक्रमाच्या अर्हतेसंबंधी अटी व शर्ती, आरक्षण, weightage इत्यादी समजुन घ्यावे. माहिती पुस्तिका व अभ्यासक्रम प्रोग्राम तुमच्या माहिती करिता जतन करून ठेवा.
- अभ्यासक्रमासाठी आवश्यक प्रमाणपत्राची यादी तयार करावी.
- प्रमाणपत्र अशा पध्दतीने स्कॅन करावे जेणे करून त्यातील मजकूर वाचण्यायोग्य/सुस्पष्ट असावा. भ्रमणध्वनी व्दारे स्कॅन करणे टाळावे. प्रमाणपत्र अचुक स्कॅन करणे ही सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.
- दस्ताऐवजाचे दोन्ही बाजू स्कॅन करावयाचे असल्यास एकच JPG/PNG file तयार करावी. एकापेक्षा जास्त प्रमाणपत्रे upload करावयाचे असल्यास या पध्दतीने करावे. (उदा. ईयत्ता १० वी चे दोन गुणपत्रिका किंवा अतिरिक्त प्रतिज्ञापत्र, प्रमाणपत्र किंवा नाव बदल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र इत्यादी)
- स्कॅन केलेले दस्तावेज save करून फाईल नाव द्यावे, जसे. TC, NCL, Caste Certificate, SSC Mark Sheet etc. ज्यामुळे दस्ताऐवजांमधील दुरूस्ती/सुधारणा करण्यास मदत होईल.

## नोंदणी कशी करावी ?

- संबंधीत अभ्यासक्रमावर क्लिक करावे.
- त्यामध्ये दोन लिंक असतील – ''Online Registration" व "Login for filling aplication"
- नोंदणी करिता Online Registration वर click करावे.
- विभाग निवडून पदविका विद्यालयाचे क्रमानुसार प्राधान्य निवडावे.
- सर्व आवश्यक रकाने जसे नांव, जन्म तारीख, आधार क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादी सर्व माहिती भरणे आवश्यक आहे.
- विद्यापीठाव्दारे जाहीर केलेल्या सर्व सुचना आपल्या नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकावर sms व्दारे पाठविण्यात येईल. त्याकरिता सर्व माहिती अचूक भरावी.
- अर्ज सादर करेपर्यंत त्यामध्ये बदल करता येईल. एकदा अर्ज व शुल्क भरणा झाल्यावर अर्जामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल करता येणार नाही.

## <u>ऑनलाईन आवेदन शुल्काचा भरणा कसा करावा ?</u>

- अर्जाचे शुल्क फक्त www.onlinesbi.com या ऑनलाईन संकेतस्थळाच्या माध्यमाद्वारे शुल्क स्विकारले जाईल.
- होम पेजमधुन सुध्दा एस. बी. आय. द्वारे शुल्क सादर करता येईल. अटी मान्य केल्याचा बॉक्स सीलेक्ट करून Proceed बटन दाबावी.
- शुल्काची Application form fees निवडुन शुल्काचा भरणा Debit Card/Credit Card किंवा Internet Banking व्दारे करता येईल.
- हिस्ट्ररीमध्ये जावुन जमा केलेल्या शुल्काची पावती/विवरण बघता येईल.
- एकदा सादर केलेले शुल्क कोणत्याही परिस्थितीत परत करता येणार नाही.

## ऑनलाईन आवेदन अर्ज कसे भरावे ?

- ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता असलेल्या संकेतस्थळावरील सुचनेप्रमाणे अर्जदाराने अर्ज भरावा.

## <u>प्रमाणपत्र</u> upload करतांना काळजी घ्यावी .

- ऑनलाईन अर्ज भरण्याकरीता असलेल्या संकेतस्थळावरील सुचनेप्रमाणे अर्जदाराने <u>प्रमाणपत्र</u> upload करतांना काळजी घ्यावी.

## अर्जाचा पासवर्ड विसरले असल्यास काय करावे ?

- ज्या अभ्यासक्रमासाठी अर्ज सादर केला आहे त्यावर click करावे व Registered User click करावे. लॉगईन पेज दिसेल.
- Forget Password/Application ID वर click करावे. सर्व माहिती बरोबर भरल्यानंतर आपला Application ID व Password स्क्रीन वर दिसेल.

## फेरसादर करण्याची सुविधा काय आहे ?

- अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत प्राप्त अर्जाची प्राथमीक तपासणी केल्या जाईल. त्यामध्ये चुकीचे दस्तावेज/अपुर्ण/त्रृटी असलेले अर्ज/शुल्क नसलेले अर्ज उमेंद्वारांच्या नावाची यादी वेबसाईटवर जाहीर करण्यात येईल. अशा उमेद्वारांना आवश्यक शुल्क भरूण तक्रार नोंदवील्यास निर्धारीत दिनांक, वेळ व ठिकाणी तक्रार निर्वारण समितीपुढे उपस्थित राहुन दस्तावेज upload करण्याची संधी देण्यात येईल अशा त्रुटींची पुर्तता करण्याची सर्वस्वी जबाबदारी उमेद्वाराची राहील.

## तात्पुरती गुणवत्ता यादी, अंतिम गुणवत्ता यादी किंवा पर्याय भरण्यासंबंधी केलेली विनंती, प्रवेश वाटप, reporting माहिती कशी जाणुन घ्यावी ?

- उमेद्वाराने वारंवार वेबसाईट वर जाऊन प्रवेश कार्यक्रमानुसार प्रवेशासंबंधीची माहिती अवगत ठेवावी.
- तसेच Application ID व Password ने login करून गुणवत्ता यादी व प्रवेश वाटप तपासावे.

## व्यवस्थापन कोटा :

- अंतिम गुणवत्ता यादीतील व कोणत्याही फेरीत प्रवेश न घेतलेल्या अर्जदारास व्यवस्थापन कोट्यात प्रवेश घेता येईल.